THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 14TH FEBRUARY 1895.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

**पळून गेलेल्या अपराध्यांस स्वाधीन करण्याच्या संबंधानें प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटांस व जिल्हा माजिस्ट्रेटांस विवक्षित अखत्यार व अधिकार देण्याबद्दलच्या आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थी, सन १८७०चा (इंग्लंडचा) अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयीं आक्ट, ह्यांत इतर ठरावांशिवाय असाही ठराव आहे कीं, तो आक्ट आर्डर इन् कौन्सिलअन्वयें लागू केला असतां, त्या आर्डरींत अन्य प्रकारें ठरविलें असेल तो प्रसंग खेरिज करून इतर प्रसंगीं, प्रत्येक ब्रिटिश मुलुकास तो लागू होईल, आणि तो असा लागू होतांना त्यांत इतर फेरफारांशिवाय खालील फेरफार ह्मणजे,—

> कोणत्याही सेक्रेटरी आफ् स्टेटच्या वारंटाची जरूर पडणार नाहीं आणि पळून गेलेल्या अपराध्यांस स्वाधीन करण्याच्या संबंधाचे पोलीस माजिस्ट्रेटास आणि सेक्रेटरी आफ् स्टेट ह्यांस किंवा ह्यांपैकीं कोणासही असलेले सर्व अधिकार अगर त्याच संबंधानें त्या पोलीस माजिस्ट्रेटास आणि सेक्रेटरी आफ् स्टेट ह्यांस किंवा ह्यांपैकीं कोणासही सदर्हू आक्टाअन्वयें करावयाचा अधिकार दिलेलीं अगर त्यांनीं केलीं पाहिजेत अशीं कृत्यें, ब्रिटिश मुलुकांतील फक्त गव्हर्नरानें केलीं असतां चालतील,

हा फेरफार केला जाईल ;

आणि ज्या अर्थीं सदर्हू आक्टाअन्वयें असेंही ठरविण्यांत आलें आहे कीं, कोणत्याही ब्रिटिश मुलुकांतील कायदे करणाऱ्या मंडळीनें सदर्हू आक्ट मंजूर होण्याच्या आधीं अगर नंतर केलेल्या कोणत्याही कायद्यामध्यें अगर हुकुमामध्यें जर, पळून गेलेले अपराधी, जे त्या मुलुकांत असतील अगर असल्याविषयीं संशय असेल त्या अपराध्यांस त्या मुलुकांत स्वाधीन करण्याचें काम अमलांत आणण्यासाठीं ठराव केले असले, तर मलिका माआझमा ह्यांस, सदर्हू आक्ट कोणत्याही परकी संस्थानाच्या बाबतींत लागू करतांना करावयाच्या आर्डर इन् कौन्सिलअन्वयें अगर तदनंतरच्या कोणत्याही हुकुमाअन्वयें एकतर—

सदर्हू आक्ट अगर त्याचा कोणताही भाग त्या परकी संस्थानास जेवढा लागू असेल तेवढ्या पुरता, सदर्हू प्रकारच्या कोणत्याही ब्रिटिश मुलुखांत सदर्हू प्रकारचा कोणताही कायदा अगर हुकुम अमलांत राहील तोंपर्यंत मात्र, त्या आक्टाचा अगर त्याच्या त्या भागाचा अमल तहकूब करण्याचा अधिकार आहे,

अगर सदर्हू कायदा अगर हुकुम अगर त्याचा कोणताही भाग सदर्हू आक्टाचा अंश असल्याप्रमाणेंच सुधारणा व फेरफार यांनिशीं अगर त्यांशिवाय अशा ब्रिटिश मुलुखांत अमलांत राहील असें फर्माविण्याचा अधिकार आहे;

आणि ज्याअर्थी, सदर्हू सन १८७० च्या अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींच्या आक्टाची सुधारणा सन १८७३ च्या अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींच्या आक्टाअन्वयें करण्यांत आलेली असून, त्या सन १८७३च्या आक्टांत, तो आक्ट व सन १८७० चा सदर्हू आक्ट ह्यांस एकच समजावें असें आणि त्या दोन्ही आक्टांचा एकत्र उल्लेख करावयाचा असल्यास त्यांस सन १८७० व १८७३ चे अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींचे आक्ट ह्मणावें, असें ठरविलें आहे;

आणि ज्या अर्थीं, पळून गेलेल्या अपराध्यांस स्वाधीन करण्यासंबंधाचे जे अख्त्यार व अधिकार सदर्हू आक्टांअन्वयें युनैटेड किंग्डममध्यें पोलीस माजिस्ट्रेटांस व जस्टिस आफ् धी पीस यांस दिलेले आहेत ते प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटांस व जिल्हा माजिस्ट्रेटांस देऊन सदर्हू सन १८७० व १८७३चे अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींचे आक्ट ब्रिटिश हिंदुस्थानांत जास्त चांगल्या रीतीनें अमलांत आणणें इष्ट आहे;

त्या अर्थीं, ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहेः—

सरनामा व सुरुवात.

(१) ह्या आक्टास सन १८९५ चा अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींचा (हिंदुस्थानचा) आक्ट असें म्हणावें; आणि

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे हा आक्ट अमलांत येण्याची जी तारीख इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन ठरवितील, त्या तारिखेस तो अमलांत येईल.

मात्र इतकेंच कीं, हा आक्ट, सन १८७०चा अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयीं आक्ट ह्याचा भाग असल्याप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानांत अमलांत यावा असें मलिका माआज्ञमांकडून आर्डर इन् कौन्सिलअन्वयें फर्माविण्यांत येई तोंपर्यंत आणि अशी आर्डर इंडिया गॅझेटमध्यें छापून प्रसिद्ध होई तोंपर्यंत सदर्हू प्रकारची कोणतीही तारीख नेमण्यांत येणार नाहीं.

बादशाही आक्टामध्यें पोलीस माजिस्ट्रेटांस व जास्टिस आफ् धी पीस ह्यांस दिलेले अधिकार प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटांस व जिल्हा माजिस्ट्रेटांस दिले आहेत.

२. पळून गेलेल्या अपराध्यांस स्वाधीन करण्यासंबंधानें युनैटेड किंग्डममध्यें कोणत्याही पोलीस माजिस्ट्रेटास अगर कोणताही जस्टिस आफ् धी पीस ह्यास सन १८७० व १८७३चे अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयींचे आक्ट ह्यांअन्वयें जो जो अख्त्यार दिलेला आहे आणि जें जें काम करण्यास अधिकार दिलेला आहे अगर हुकुम केलेला आहे तो तो अख्त्यार आणि तें तें काम, पळून गेलेल्या अपराध्यांस सदर्हू आक्टांअन्वयें स्वाधीन करण्याच्या संबंधानें कोणत्याही प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटाकडे अगर जिल्हा माजिस्ट्रेटाकडे ह्या कलमावरून सोंपविण्यांत येऊन, त्यानें त्याचसंबंधानें ब्रिटिश हिंदुस्थानांत तो तो अख्त्यार चालवावा, आणि तें तें काम करावें असें ठरविलें आहे.

---

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

पळून गेलेल्या अपराध्यांस स्वाधीन करण्यासंबंधाचीं जीं कामें सन १८७० व १८७३ चे पळून गेलेल्या अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयीं आक्ट ( ३३ व ३४ व्हिक्टोरिआ, चापट्टर ५२, आणि ३६ व ३७ व्हिक्टोरिआ, चापट्टर

६०) ह्यांत युनैटेड किंग्डममध्यें पोलीस माजिस्ट्रेटांस व जस्टिस आफ् धी पीस ह्यांस सांगितलीं आहेत, तीं कामें ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटांकडे व जिल्हा माजिस्ट्रेटांकडे सोंपवून देण्यासाठीं हा मसुदा सादर केला आहे. ह्या आक्टांपैकीं पहिल्या आक्टाचें कलम १७ ( २ ) व कलम २६ यांवरून, त्या आक्टांअन्वयें पोलीस माजिस्ट्रेटास नेमून दिलेलीं कामें करण्याचा अधिकार हिंदुस्थानच्या कोणत्याही भागाच्या गव्हर्नरास त्याच्या इलाख्यांत मिळतो, परंतु हीं कामें दुसऱ्या कोणास सांगण्याचा अधिकार त्या गव्हर्नरास दिलेला नसल्यामुळें, आणि त्या कारणानें त्यास तीं कामें स्वतः जातीनें करणें भाग असल्यामुळें सदहू ठराव ह्या देशांतील गरजा भागविण्यास पुरा असा नाहीं, आणि त्यापासून लोकांची फार गैरसोय मात्र होण्याचा संभव आहे म्हणून, सिलोन व इतर कालोनीसमधील कायदे करणाऱ्या मंडळ्यांनीं ज्याप्रमाणें ह्यासंबंधानें विशेष कायदे केले आहेत त्याप्रमाणें इकडेही एक विशेष कायदा करण्याचें ठरलें आहे. त्या कायद्याच्या संबंधानें आॅर्डर इन कौन्सिलअन्वयें तसा हुकुम करण्यांत आला म्हणजे, तो कायदा सदहू इंग्रजी आक्टांचा भाग असल्याप्रमाणें हिंदुस्थानांत अमलांत येईल. सदहू सन १८७० व १८७३ च्या आक्टांअन्वयें होणारीं माजिस्ट्रेटी कामें हिंदुस्थानामध्यें सदरीं निर्दिष्ट केलेल्या माजिस्ट्रेटांच्या हातून करून घेण्याचा ठराव यावरून करण्यांत आला आहे. शिवाय, ह्या मसुद्यास सन १८७७ चा सिलोनचा अपराध्यांस स्वाधीन करण्याविषयीं कायदा ह्यांतील ठरावांचा आधार घेतलेला असून, ते ठराव बहुतांशीं ह्यांत उतरून घेतले आहेत.

अलेक्झांडर एडवर्ड मिलर.

तारीख २३ माहे जानेवारी सन १८९१.

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.